॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ५ : भाषा अभ्यास व विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांच्या माती, माणसे, बोलीभाषा आणि साहित्यप्रवाहाशी संबंधित पाच पुस्तकांचे नाविन्यपूर्ण उपक्रमातून प्रकाशन करण्यात आले. विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व विचारधारा प्रशाळेतील कर्मचाऱ्यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा पार पडला.

यामध्ये '२४ बोली भाषा' आणि 'गावखेड्यातील साहित्य प्रवाहाचा अनुबंध' या पुस्तकांचे प्रकाशन गौरव हरताळे यांच्या हस्ते, 'मातीची माणसे' व 'लोकधारा' या पुस्तकांचे प्रकाशन रेखा साळी यांच्या हस्ते, 'परीघाबाहेरच्या साहित्य प्रवाहाचा धम्मप्रवेश' या पुस्तकाचे प्रकाशन चंद्रकांत बि-हाडे यांच्या हस्ते, तर 'गावगाडा' या पुस्तकाचे प्रकाशन योगेश चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्राईम पब्लिकेशनचे प्रकाशक प्रदीप पाटील आणि हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी उपस्थित होते. गौरव हरताळे यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त करत पुस्तकनिर्मितीच्या प्रवासातील अनुभव मांडले. लेखक प्रा. म. सु. पगारे यांनी कर्मचाऱ्यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन व्हावे, ही संकल्पना आनंददायी व प्रेरणादायी असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. सुनील कुलकर्णी यांनी या उपक्रमाचे कौतुक करत सर्वसामान्य कर्मचाऱ्यांच्या हस्ते ग्रंथप्रकाशन करण्याचा आदर्श उपक्रम असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात यांनी केले, तर त्यांनीच आभार प्रदर्शन केले.

बातमी नं. २

जळगाव (प्रतिनिधी) दि. ५ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेतील संशोधक विद्यार्थी प्रतिक वाघ यांना रसायनशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीची अधिकृत अधिसूचना कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

प्रतिक वाघ यांनी 'डेव्हलपमेंट ऑफ न्यूवर सिंथेटिक मेथड युजिंग एंजाइम एज ग्रीन कॅटलिस्ट' या विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनात एन्झाइमचा हरित उत्प्रेरक म्हणून वापर करून पर्यावरणपूरक सेंद्रिय संश्लेषणाच्या नवीन पद्धती विकसित करण्यात आल्या आहेत. त्यांच्या संशोधनाचे दोन लेख आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत.

यावेळी त्यांचे संशोधन मार्गदर्शक व रसायन शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. दीपक एस. दलाल उपस्थित होते. प्रतिक वाघ यांच्या यशाबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू डॉ. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ नोव्हेंबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता